# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/09/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## लोखंड चोरी

**१) पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा वाकोडी शिवार येथे दिनांक १५/०६/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग. भा. किरण अर्जुन चौरसिया, वय ३७ वर्षे, रा. मेडीकल चौक चंदन नगर, नागपूर यांचे शेतातील वॉल कंपाउंडचे २० ते २५ लोखंडी ऐंगल किंमती १०,०००/–रू. चे कोणीतरी अज्ञात चोरांनी रात्री दरम्यान चोरून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोंडे पो.स्टे. खापा हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील सालईदाभा येथे दिनांक १३/०९/२०२३ चे १४.०० वा. ते दिनांक १६/०९/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पियुश वसंतकुमार श्रिमानकर, वय ४५ वर्षे रा. गणेशपेठ नागपूर यांचे शेतामधील कोणीतरी अज्ञात चोरटयाने एक जुनी वापरती ईलेक्ट्रीक मोटर किंमती ५,४००/–रू व एक गो गॅस हंडा किंमती अंदाजे १९००/– रू. आणि टिकास सब्बल पावडा किंमती १०००/–रू असा एकुण ८,३००/–रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एम आय डी सी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ३७७ दिप पांडे पोस्टे MIDC बोरी हे करीत आहे.

## विनयभंग

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक १७/०९/२०२३ चे १२.३० वा. ते १२.३५ वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता ही घरचे किराणा दुकानात बसली असता **आरोपी नामे– राजु पांचारे रा. ह. मु. बन्सल कंपनी फेटरी ता. कळमेश्वर जि. नागपुर**

याने फिर्यादीचा उजवा हात पकडुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३५४, ५०६ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास जि. पी.एस. आय. बारई पोस्टे कळमेश्वर हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :— मार्च २०२३ ते दि. १४/९/२०२३ दरम्यान आरोपी नामे— संदेश राजेन्द्र तागडे, वय २८ वर्ष रा. हातला ता. काटोल हा फिर्यादीच्या मागे मागे येवून बोलण्याचा प्रयत्न करत असुन गावातील मुलांना काहीतरी सागंत होता व गावातील मुले फिर्यादिला आरोपिच्या नावाने आवाज देत होते त्यामुळे फिर्यादी त्रासुन तिचे आईला सांगीतले फिर्यादिचे मामा व आई आरोपीच्या घरी गेले असता फिर्यादीच्या मामाला व आईला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. नेहमीच फिर्यादी कॉलेजला जात असताना आरोपी बसस्टॅंडवर उभा राहुन एकटक पाहुन हसत होता. मार्च/२३ ते १४/९/२३ रोजी सकाळी १०/३० पोळयाच्या दिवशी फिर्यादी कॉलेजला जात असताना आरोपी रस्त्यात येवुन तु माझ्या सोबत बोलत जा नाहीतर तुझी बदनामी करीन. आरोपी हा फिर्यादीचा सतत पाठलाग करून तिला लज्जा निर्माण होईल असे वागून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड), ५०४, ५०६, भादवी सहकलम १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनी शितल खोब्रागडे मॅडम मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर